ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबावत.(श्री.नेताजी शिवाजी भावड सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वाघा पंचायत समिति जामखेड)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र ९४६५३४२
दिनांक - ०६ / ०८ /२०२५

संदर्भ १. या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१५१/२०२४ दिनांक २८/०३/२०२४ (सेवा निलंबन आदेश)

२. या कार्यालयाचे दोषारोप ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२२८/२०२४ दिनांक २१/०५/२०२४

३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-१११२/प्र.क्र.०९/विचौ -२ दिनांक- २२ एप्रिल २०२५

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्री.नेताजी शिवाजी भावड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वाघा पंचायत समिति जामखेड यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे व्दारा गुन्हा दाखल असल्याने व त्यांनी कार्यालयीन कामी कर्तव्यात कसुर करण्याचे गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.०२ चे ज्ञापनान्वये श्री.नेताजी शिवाजी भावड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वाघा पंचायत समिति जामखेड यांचे गैरवर्तना बावत एकूण ०२ आरोप ठेवून शिस्तभंगाची कार्यवाही करणे कामी दोषारोप बजावण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्रमांक ०३ चे शासन निर्णयानुसार श्री.नेताजी शिवाजी भावड , सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा सेवा निलंबन कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक झालेला आहे. त्यांचे गैरवर्तनाबावतची विभागीय चौकशी सुरु करणे या बावतचा निर्णय घेणे अदयाप बाकी आहे. त्यांचे सेवानिलंबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आलेला असुन या निलंबन प्रकरणी श्री. नेताजी शिवाजी भावड यांचे सेवानिलंबन या पुढे चालू न ठेवण्याचा व जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.नेताजी शिवाजी भावड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वाघा तालुका जामखेड यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती अहिल्यानगर ग्रापं- नागरदेवळे येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री.नेताजी शिवाजी भावड सेवानिलंवीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती जामखेड यांचा या सेवा निलंवन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविपयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

या आदेशाची नोंद श्री.नेताजी शिवाजी भावड सेवानिलंवीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती जामखेड यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिपदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 20250806060102 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 24-07-2025 12:25:28
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिपद अहिल्यानगर

प्रति,

श्री.नेताजी शिवाजी भावड सेवानिलंवीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती जामखेड
मुख्यालय पंचायत समिती कोपरगाव

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

२/-सोवतचा आदेश संवंधीतास वजावून तो मिळालेवावतची पोहच कार्यालयास अहवाल सादर करावी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर

२/- श्री.नेताजी शिवाजी भावड सेवा निलंवीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर त्या वावतचा अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.